सकाळ

# विद्यापीठातील प्रवेश प्रक्रिया सुटी दिवशीही राहणार सुरू

## विविध ४८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर, ता. ७ : पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची शिवाजी विद्यापीठातील प्रवेश प्रक्रिया उद्या, शनिवारी आणि रविवारी (ता.९) या सुटीदिवशी सुरू राहणार आहे.

विद्यापीठातील विविध अधिविभाग आणि तेथील प्रवेश समिती, पी. जी. अॅडमिशन विभाग, संगणक केंद्र, विशेष कक्ष, आदी विभाग हे प्रवेश प्रक्रियेशी संबंधित आहेत. त्यामुळे या विभागांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या दोन सुटीदिवशी अधिविभाग अथवा विभागामध्ये हजर राहून प्रवेश प्रक्रियेचे काम करावे, अशी सूचना प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केली आहे. दरम्यान, एम. ए., एम. बी. ए., एम. सी. ए., आदी सहा अभ्यासक्रमांच्या परीक्षा आज झाल्या. त्यासाठी १८३३ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेच्या कालावधीत भरारी पथकाने केलेल्या कारवाईमध्ये १० विद्यार्थी कॉपी करताना सापडले. त्यात सातारा जिल्ह्यातील ७ आणि सांगली जिल्ह्यातील २ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विविध ४८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहे. त्यात बी. व्होक. फूड प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी, रशियन लँग्वेज, बी. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, एम.एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

तरुण भारत

# विद्यापीठ प्रवेश प्रक्रिया आज, उद्या सुरू राहणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी विविध अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया शनिवार दि. ८ व ९ रोजी कार्यालयीन सुट्टी दिवशी सुरु राहणार असल्याची माहीती प्र. कुलसचिवांनी दिली. अधिविभागातील प्रवेश समिती, अधिविभाग, पी. जी. प्रवेश विभाग, संगणक केंद्र व विशेष कक्ष आदी विभागातील प्रवेश प्रक्रीयेशी निगडीत सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शनिवार दि. ८ व ९ रोजी आपल्या अधिविभागामध्ये हजर राहून प्रवेश प्रक्रीयेचे कामकाज करण्याच्या सूचना केल्या आहेत. याची विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे आवाहन केले आहे.

पुण्यनगरी

# सुटीदिवशी प्रवेश परीक्षेचे कामकाज सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात यंदाच्या शैक्षणिक वर्षांतर्गत विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठाचे कामकाज दि. ८ आणि ९ जुलै या सुटीच्या दिवशीही सुरू राहणार असल्याची माहिती परीक्षा विभागातर्फे दिली आहे. विविध अधिविभागांतील प्रवेश प्रक्रिया समिती, उच्च शिक्षण प्रवेश विभागातील कर्मचारी, संगणक कक्ष व विशेष कक्ष या विभागांतील प्रवेश प्रक्रियेशी निगडित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी हजर राहून काम करावे, अशा सूचना दिल्या आहेत.